**मा. जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या जिल्हा खनिकर्म विभाग अंतर्गत जालना जिल्ह्यातील घनसावंगी, मंठा, जाफ्राबाद, भोकरदन, परतुर व बदनापुर तालुक्यामधील प्रस्तावित केलेल्या एकूण २७ वाळुघाटाच्या अनुषंगाने दिनांक १८/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

..........................................................................................................................

मा. जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या जिल्हा खनिकर्म विभाग अंतर्गत जालना जिल्ह्यातील घनसावंगी, मंठा, जाफ्राबाद, भोकरदन, परतुर व बदनापुर तालुक्यामधील प्रस्तावित केलेल्या एकूण २७ वाळुघाटाच्या अनुषंगाने दिनांक १८/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६२/२०२५ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी)/पीएच/बी- २५०८२०- एफटीएस-०१६० दि. २०/०८/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्रीमती. रीता मेत्रेवार,**<br>अपर जिल्हादंडाधिकारी, जालना. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. मनिष होळकर,**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | : | सदस्य |
| ३. | **श्रीमती. सिंधु कापरे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

श्रीमती. सिंधु कापरे, समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत

करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीच्या अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. तदनंतर त्यांनी सांगितले की, मा. जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचा जिल्हा खनिकर्म विभाग अंतर्गत प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील घनसावंगी, मंठा, जाफ्राबाद, भोकरदन, परतुर व बदनापुर तालुक्यामधील प्रस्तावित केलेल्या एकूण २७ वाळूघाटाबाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास महाराष्ट्र शासनाची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रस्तावित वाळूघाटांसाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांचा जिल्हा खनिकर्म विभाग अंतर्गत जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. ०७ ऑगस्ट २०२५ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी डी. पी. डी. सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि. १८ सप्टेंबर २०२५ वेळ-सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी दैनिक सकाळ (मराठी) व दि. १४ ऑगस्ट २०२५ दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, जालना.
३. व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, जालना.
४.तहसिलदार, तहसिल कार्यालय- घनसावंगी.
५.तहसिलदार, तहसिल कार्यालय- मंठा.
६. तहसिलदार, तहसिल कार्यालय- जाफ्राबाद.
७.तहसिलदार, तहसिल कार्यालय- भोकरदन.
८.तहसिलदार, तहसिल कार्यालय- परतूर.
९. तहसिलदार, तहसिल कार्यालय- बदनापूर.
१०. ग्रामपंचायत कार्यालय मुद्रेगाव, ता. घनसावंगी.
११. ग्रामपंचायत कार्यालय अंतरवाली राठी, ता. घनसावंगी.
१२. ग्रामपंचायत कार्यालय इंचा, ता. मंठा.
१३. ग्रामपंचायत कार्यालय दुधा-सासखेडा, ता. मंठा.
१४.ग्रामपंचायत कार्यालय टाकळखोपा, ता. मंठा.

१५. ग्रामपंचायत कार्यालय किर्ला, ता. मंठा.
१६. ग्रामपंचायत कार्यालय कानडी, ता. मंठा.
१७. ग्रामपंचायत कार्यालय लिंबखेडा, ता. मंठा.
१८. ग्रामपंचायत कार्यालय उस्वद, ता. मंठा.
१९. ग्रामपंचायत कार्यालय देवठाणा, ता. मंठा.
२०. ग्रामपंचायत कार्यालय खोरवड, ता. मंठा.
२१. ग्रामपंचायत कार्यालय वझर-सरकटे, ता. मंठा.
२२. ग्रामपंचायत कार्यालय वाघाळा, ता. मंठा.
२३. ग्रामपंचायत कार्यालय पोखरी केंधळी, ता. मंठा.
२४. ग्रामपंचायत कार्यालय पिंपळखुटा, ता. जाफ्राबाद.
२५. ग्रामपंचायत कार्यालय देऊळगाव उगले, ता. जाफ्राबाद.
२६. ग्रामपंचायत कार्यालय खडकी, ता. भोकरदन.
२७. ग्रामपंचायत कार्यालय बोरगांव खडक, ता. भोकरदन.
२८. ग्रामपंचायत कार्यालय नांजा, ता. भोकरदन.
२९. ग्रामपंचायत कार्यालय कठोरा (जैनपूर), ता. भोकरदन.
३०. ग्रामपंचायत कार्यालय खापरखेडा, ता. भोकरदन.
३१. ग्रामपंचायत कार्यालय मेरखेडा, ता. भोकरदन.
३२. ग्रामपंचायत कार्यालय केदारखेडा, ता. भोकरदन.
३३. ग्रामपंचायत कार्यालय आंबा, ता. परतुर.
३४. ग्रामपंचायत कार्यालय डोल्हारा, ता. परतुर.
३५. ग्रामपंचायत कार्यालय बाबुलतारा, ता. परतुर.
३६. ग्रामपंचायत कार्यालय बाबई, ता. परतुर.
३७. ग्रामपंचायत कार्यालय बाजार वाहेगाव, ता. बदनापूर.
३८. ग्रामपंचायत कार्यालय नानेगाव, ता. बदनापूर.
३९. ग्रामपंचायत कार्यालय कडेगाव, ता. बदनापूर.
४०. ग्रामपंचायत कार्यालय वरूडी, ता. बदनापूर.
४१. ग्रामपंचायत कार्यालय मांजरगाव, ता. बदनापूर.
४२. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
४३. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजी नगर.
४४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

४५. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

४६. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे एक सूचना दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या ईमेलद्वारे प्राप्त झालेली आहे (प्रत सोबत). तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंतर त्यांनी, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीच्या अध्यक्ष यांना पुढिल कार्यवाही सूरू करण्यासाठी विनंती केली.

त्यानंतर मा. श्रीमती रिता मेत्रेवार अपर जिल्हादंडाधिकारी, जालना तथा लोक सुनावणी समितीच्या अध्यक्ष यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार डॉ. आशीष शूक्ला, मे. एन्व्हायरो टेक्नो कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांनी प्रकल्पाबददल तालूकानिहाय विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. जालना जिल्हयातील घनसावंगी, मंठा, जाफ्राबाद, भोकरदन, परतुर व बदनापुर तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी साठी अर्ज केलेला आहे.

त्यांनी पूढे सांगितले की, सदर वाळूघाटावर वाळू उपसा करण्यासाठी कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल,

खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेतल्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका घनसावंगी -**

| अ. क्र. | वाळू घाटाचे नाव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरुंदीxखोली | क्षेत्रफळ हेक्टर | उपलब्ध वाळूचे साठे (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुद्रेगाव | ११५ ते ११७, १२१, १२२, १२९ | ४५०x५०x१ | २.२५ | ७९५१ |
| २ | अंतरवली राठी | १३०, १३१, १३३, १३४ | ५९०X१७X१ | १.०३ | ३५४४ |

**तालुका मंठा -**

| अ. क्र. | वाळू घाटाचे नाव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरुंदीxखोली | क्षेत्रफळ हेक्टर | उपलब्ध वाळूचे साठे (पितळ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सासखेडा-इंचा | सासखेडा – ४, ६, ७<br>इंचा - १११ ते ११९ | ५००x५०x०.८ | २.५ | ७०६७ |
| २ | दुधा-टाकळखोपा | दुधा - 2 ते ११<br>टाकळखोपा - २०४, २३५ ते २३८, २४२ | ३५०x३०x०.८ | १.०५ | २९६८ |
| ३ | टाकळखोपा - किर्ला | किर्ला - ४० ते ४३, ४७, ४८, ५०, ५१<br>टाकळखोपा - ४० ते ४४, ४६, ४७, ५० ते ५८, ९१ ते ९७, १०२, ३६०, २८१ ते २८४ | ६५०x५०x०.८ | ३.२५ | ९१८७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कानडी-लिंबखेडा | कानडी - ६३ ते ६७, ९६ ते १०० लिंबखेडा - ४ ते २० | ५००X५०X१ | २.५ | ८८३४ |
| ५ | कानडी - उस्वद १ | कानडी - ४७, ४१, ४०, ३९, ३७, ३६, २५, २३ उस्वद १ - ३१९ ते ३२३ | ४००X६०X१ | २.४ | ८४८१ |
| ६ | देवठाणा - उस्वद १ | देवठाणा - २७५, २७६, २७३, २७२, २६५, २६४, २६३ उसवड १ - ३८७ ते ३८९, ४०१, ४०२ | ३००X५०X१ | १.५ | ५३०० |
| ७ | देवठाणा - उस्वद २ | देवठाणा - २५१ ते २५३, २१०, २१२ ते २१८ उस्वद २ - ४०३ ते ४०५, ४०७ उसवड शिवार गावठाण - १ ते ४ | ३००X५०X१ | १.५ | ५३०० |
| ८ | देवठाणा - उस्वद - खोरवड | देवठाणा - ११२ ते १२१ उस्वद - ४९, ५९ खोरवड - ५६ | ३००X४०X१ | १.२ | ४२४० |
| ९ | भुवन | भुवन - १ | ५००X३०X०.८ | १.५ | ४२४० |
| १० | वाघाळा - भुवन - पोखरी केंदळी | वाघाळा - २१८, २११, २१०, २०८, १८०, १७९, १७८ भुवन - २ ते १९ पोखरी के. - १४२ ते १४५ | ६००x५०x०.८ | ३ | ८४८१ |
| ११ | वाघाळा - किर्ला | वाघाळा — ७३ ते ७६, ८० ते ८६ किर्ला — ३२, ३३, ३५, ३६, ३७, ३८, १६, १७, १५४, १५६ | ७३०x४०x०.८ | २.९२ | ८२५४ |

**तालुका जाफराबाद -**

| अ. क्र. | वाळू घाटाचे नाव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरुंदीxखोली | क्षेत्रफळ हेक्टर | उपलब्ध वाळूचे साठे (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळखुटा – देऊळगाव उगले | पिंपळखुटा – ८६, ८८, ९७ देऊळगाव उगले – २०४, २०३, २०१ | ४५०X२३X०.८ | १.०४ | २९२६ |

**तालुका भोकरदन -**

| अ. क्र. | वाळू घाटाचे नाव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरुंदीxखोली | क्षेत्रफळ हेक्टर | उपलब्ध वाळूचे साठे (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खडकी – बोरगाव खडक | खडकी – १३० ते १३२, १४३ ते १४५ बोरगाव खडक – ५०, ४९, १३३, १३२ | ५२०X३०X०.८ | १.५६ | ४४०९ |
| २ | नांजा - कठोरा जैनपूर | नांजा- २९ ते ३१ कठोरा जैनपूर – ४२, ४७ | ५२०X३५X१ | १.८२ | ६४३१ |
| ३ | खापरखेडा | २९, ३०, ३३, ३५ | ६५०x२०x१ | १.३ | ४५९४ |
| ४ | मेरखेडा | ३० ते ३४ | ३००X४०X१ | १.२ | ४२४० |
| ५ | पिंपळगाव सुळ | ०२, ०३, ०७, ०८ | ४५०x२५x०.८ | १.१२५ | ३१८० |

**तालुका परतूर -**

| अ. क्र. | वाळू घाटाचे नाव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरुंदीxखोली | क्षेत्रफळ हेक्टर | उपलब्ध वाळूचे साठे (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंबा | ७८, ७९, ८०, ८१ | ५००X२५X०.८ | १.२५ | ३५३४ |
| २ | डोल्हारा – बाबुलतारा | डोल्हारा – ५४, ५५, ५९, ६०, ६१, ७२ ते ७७ बाबुलतारा – ४१ ते ४६ | ५८०x५५x०.५ | ३.१९ | ५६३६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | बाबई | ४६ ते ४९, ४४, ५२, ५४, १६६, ५५ ते ६४ | ५५०x५५x०.५ | ३.०२५ | ५३४५ |

**तालुका बदनापूर -**

| अ. क्र. | वाळू घाटाचे नाव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरुंदीxखोली | क्षेत्रफळ हेक्टर | उपलब्ध वाळूचे साठे (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाजार वाहेगाव | २६०, २६१, २६२, २७५ ते २८२, २८६ | ११००X१०X१ | १.१ | ३८८७ |
| २ | नाणेगाव | १७ ते २१, २६, २८ | १०००x१०x१ | १ | ३५३४ |
| ३ | कडेगाव | १२८, १८१, १८०, १७५, १७९, १७३, १४९, १५५ ते १६४ | ४४५X८०X१ | ३.५६ | १२५८० |
| ४ | वरुडी | २०४, २५५, ३०६, ३०४, ३०३, २७३, २५३, २५०, २०४, ३०७, ३०८, ३०९, ३११, ३१४, १९९, १९५, १८८, १९०, १०४ | ३००X६०X२ | १.८ | १२७२१ |
| ५ | मांजरगाव | ९१, १२४, १२५, १३१, १३९, १३८, १३४, १३२, १३३, १३५, १९९, २०१, २०३, २०४, २१२, २१३, २१५, २१६, २२१, २२२, २२३ | ९००X१५X१ | १.३५ | ४७७० |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्रीमती. सिंधु कापरे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, जालना यांनी उपस्थितांना सांगितले की, आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण

आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

१. **श्री. किशोर डोईफोडे, तलाठी, बाबुलतारा डोल्हारा** यांनी विचारले की, सदर प्रस्तावित वाळूघाट प्रकल्पाच्या आजूबाजूस झाडे लावणे अनिवार्य किंवा बंधनकारक आहे काय.

**यावर प्रकल्पाचे सल्लागार** यांनी सांगितले की, सदर वाळूघाटाच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पर्यावरण व्यवस्थापन योजनेअंतर्गत दिलेल्या मार्गतत्वानुसार डेपोधारक यांना झाडे लावणे बंधनकारक आहे.

२. **श्री. विठठल उफाड, तलाठी, मंठा** यांनी विचारले की, वाळू उपसा करण्यासाठी मागच्या वर्षीप्रमाणे डेपोधारकाप्रमाणे करण्यात आला होता. यावर्षी सुध्दा अशाच प्रकारे वाळू उपसा करण्यात येईल का.

**यावर प्रकल्पाचे सल्लागार** यांनी सांगितले की, दि. ०८ एप्रिल २०२५ रोजीच्या वाळू निर्गमीतीच्या धोरणा नुसार सर्व वाळू घाटाचे लिलाव करण्यात येईल तसेच शासनाच्या धोरणानुसार लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाला यामध्ये वयक्तिकरित्या भाग घेता येईल.

३. **श्री. मनिष होळकर, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, छ.संभाजीनगर** यांनी प्रकल्पाचे सल्लागार यांना विचारले की, सदर वाळू घाट पर्यावरण व्यवस्थापन योजनेमध्ये दिलेला अंदाजे खर्च हा मागील वर्षाच्या दिलेल्या खर्चातील पुनरावृत्ती असल्याचे दिसते. तसेच यापैकी किती खर्च पर्यावरण व्यवस्थापण देखरेख मध्ये करण्यात आला.

**यावर प्रकल्पाचे सल्लागार** यांनी सांगितले की, मागील वर्षी दिलेले वाळूघाट वेगळे आहेत तसेच आताचे वाळूघाट नव्याने प्रस्तावित केलेले आहेत. पर्यावरण व्यवस्थापणेमध्ये दरवर्षी अंदाजे रक्कम दिल्या जाते यामध्ये लांबी, रूंदी व खोली च्याअनुषंगाने वाहतूक खर्च, वृक्षारोपण खर्च हा कमी किंवा जास्त होत असतो या सर्व बाबींच्या अभ्यासानुसार अंतिम टप्प्यात इएमपी अहवाल तयार करण्यात येतो. तसेच मागील वर्षी नमुद पर्यावरण व्यवस्थापण खर्च पूर्ण करण्यात आलेला आहे.

**पूढे श्री. मनिष होळकर** यांनी विचारले की, वाळू घाटाबाबत सहा महिण्यांचा अनुपालन अहवाल आपण सादर केलेला आहे का व सादरीकरणामध्ये आपण अक्षांश आणि रेखांश याबाबत सांगितले नाही.

**यावर प्रकल्पाचे सल्लागार** यांनी सांगितले की, सदर वाळूघाटाचा कालावधी हा जास्तीत जास्त एक किंवा दोन वर्षासाठी देण्यात येतो त्यामूळे सहा महिण्यांचा अनुपालन अहवाल तयार करण्यात येत नाही. सदरच्या व्यवस्थापन योजनेअंतर्गत अनुपालन अहवाल मा. तहसिलदार किंवा मा. खनिकर्म अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येतो. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा सनियंत्रण समितीमध्ये सदर अनुपालन अहवालाची तपासणी करण्यात येते. तसेच अक्षांश आणि रेखांश याबाबतची माहिती सर्व्हेक्षण अहवालामध्ये नमुद केलेली असते. तसेच सदर वाळूघाट उत्खनन दोन वर्षासाठी प्रस्तावित आहेत यामध्ये दिलेल्या नियोजीत क्षमतेप्रमाणेच वाळूचे उत्खनन करण्यात येणार आहे. तसेच सदर उत्खननाचे मोजमाप करण्यात येते त्यामूळे अवैध्यरित्या वाळूचे उत्खनन होणार नाही.

**यावर पूढे श्रीमती रीता मेत्रेवार, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जालना** यांनी सांगितले की, मागील वर्षी मान्यताप्राप्त वाळू घाटाचे लिलाव पूर्ण झालेले आहेत तसेच सदरचे वाळू घाटाचे प्रमाणीकरण करण्यात आलेले आहेत.

४. **श्रीमती. सिंधु कापरे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, जालना** यांनी प्रकल्पाचे सल्लागार यांना विचारले की, सदर वाळू उत्खननाची अंदाजे खोली किती आहे.

**यावर प्रकल्पाचे सल्लागार** यांनी सांगितले की, वाळू घाटासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे ०.५ ते ०.६ मीटर खोली एवढी आहे, वस्तूत: २ मीटर वाळू खोलीच्या वरतीच ठरावीक केलेल्या वाळूचे उत्खनन करण्यात येईल तसेच लांबी, रूंदी सुध्दा प्रस्तावित केल्याप्रमाणेच करण्यात येईल.

५. **श्री. संतोष सुपेकर, तलाठी, आंतरवाली राठी** यांनी विचारले की, अंतरवाली राठी गावातील प्रस्तावित केलेला वाळूघाट हा एकूण २ कि.मी. अंतराचा असून शेतरस्ता आहे तर यामध्ये काय करता येईल.

**यावर श्रीमती रीता मेत्रेवार, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जालना** यांनी सांगितले की, तालूका स्तरीय समितीद्वारे सदरच्या वाळू घाटाचे सर्व्हे झाल्यानंतरच सदरचा प्रस्ताव मा. तहसिलदार यांच्याकडून प्राप्त झालेला आहे.

श्रीमती रीता मेत्रेवार, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जालना यांनी पुन्हा उपस्थित नागरिकांना सदर प्रस्तावित वाळूघाटांबाबत अजून काही प्रश्न असल्यास विचारन्याची विनंती केली, मात्र उपस्थित नागरिकांनी कोणतेही प्रश्न किंवा सुचना उपस्थित केले नाही, तदनंतर मा. अध्यक्ष यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी अध्यक्षांचे आभार मानून संपली.

| | | |
|---|---|---|
| **सिंधु कापरे** | **मनिष होळकर** | **रीता मेत्रेवार** |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, | अपर जिल्हादंडाधिकारी |
| म.प्र.नि. मंडळ, जालना. | म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर | जालना. |